**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय**
**हिंजवडी पोलीस स्टेशन प्रेसनोट दि.०७/०७/२०२३**

**हिंजवडी पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रातील सुर्यदत्ता कॉलेज बावधन येथे मा.श्री विनयकुमार चौबे सो.पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांचे अध्यक्षतेखाली ज्येष्ठ नागरीक सहाय्यता मेळावा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.**

---

दिनांक ०७/०७/२०२३ रोजी सायं १६/३० वा ते १९/१५ वा चे सुमारास हिंजवडी पोलीस ठाणचे हद्दीतील सुर्यदत्ता कॉलेज बावधन, पुणे येथे मा.श्री.विनयकुमार चौबे,पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिंचवड यांचे अध्यक्षतेखाली हिंजवडी पोलीस ठाणेचे कार्यक्षेत्रातील राहणारे ज्येष्ठ नागरिकांकरीता ज्येष्ठ नागरिक सहाय्यता मेळावा संपन्न. सदर कार्यक्रमाचा प्रमुख पाहुण्यांचे हास्ते दिपप्रज्वलन करून शुभारंभ करण्यात आला.सदाबहार सिनियर्स संघाच्या ज्येष्ठ नागरिकांनी स्वागतगीत सादर केले.ज्येष्ठ नागरिक कक्षाचे कामकाज पाहणारे पोलीस उप निरीक्षक श्री राजेंद्र होणराव यांनी ज्येष्ठ नागरिक कक्षा बाबतचे कामकाज कायदयाविषयी पी.पी.टी.द्वारे माहिती दिली. तसेच ज्येष्ठ नागरीकांची सायबर फसवणुक होण्यापासून कसे सावध रहावे याबाबत सहा.पोलीस निरीक्षक पानमंद यांनी मार्गदर्शन केले. तसेच सहा.पोलीस आयुक्त श्री डॉ.विशाल हिरे यांनी प्रस्ताविकात ज्येष्ठ नागरिकांपैकी ऐकटे/दुकटे राहणारे ज्येष्ठ नागरिक यांची माहिती देवुन त्यांची देखभाल करणेकरीता प्रत्येकी ०१ अंमलदार यांची नेमणूक करून काही समस्या अथवा अडचण निर्माण झाल्यास तात्काळ संबंधीत अंमलदार यांचेशी संपर्क करणेबाबत सुचना देण्यात आल्या. ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या जाणून घेवुन मा.पोलीस आयुक्त सो.यांनी त्यांच्या शंका समाधन केले. अशा रितीने ज्येष्ठ नागरिकांशी पोलीसांचा ऋुणानुबंध निर्माण करीत ज्येष्ठ नागरिकांशी कायम संपर्कात राहुन त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठीचा उपक्रमास '**ज्येष्ठानुबंध**' असे नाव देवुन सदर नावाच्या पाटीचा उपस्थित मान्यवरांच्या हास्ते अनावरण करून या उपक्रमांचा शुभारंभ करण्यात आला. मा.पोलीस आयुक्त सो.यांनी आपल्या भाषाणात ज्येष्ठ नागरीकांना येणा-या दैनंदीन समस्या व त्या निवारण्यासाठी पोलींसांचा सहभाग या बाबत मार्गदर्शन केले.तसेच पुढे भाषणात '**ज्येष्ठानुबंध**' या उपक्रमाचे महत्व त्यांनी विशद करून सांगितले व असाच उपक्रम पुर्ण आयुक्तालय हाद्दीत लवकरच राबविण्यार असल्याचे प्रतिपादन केले. या आयोजित केलेल्या कार्यक्रमाकरीता प्रमुख पाहुणे तथा अध्यक्ष म्हणून मा.श्री.विनयकुमार चौबे,पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिंचवड तसेच मा.श्री.संजय शिंदे, सह.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री.डॉ.विशाल हिरे,सहा.पोलीस आयुक्त वाकड विभाग,श्री.डॉ.विवेक मुगळीकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक हिंजवडी पोलीस ठाणे,ज्येष्ठ नागरीक कक्ष पिंपरी चिंचवड पोलीस उपनिरीक्षक श्री राजेंद्र होणराव.श्री संजय बी. चोरडीया सर सुर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिटयुटस बावधन सौ.सुषमा चोरडीया मॅडम. श्री.किरण दगडे, नगरसेवक पुणे मनपा, मा.दिलीप वेडेपाटील, नगरसेवक, पुणे मनपा, श्री.नीलकंठ बजाज, अध्यक्ष, सदाबहार सिनिअर्स संघ बावधन, व इतर मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रमामध्ये हिंजवडी पोलीस ठाणेचे परिसरातील सुमारे २०० ते २२५ जेष्ठ नागरिक सहभागी झाले होते. सदर ज्येष्ठ नागरिक सहाय्यता मेळावा कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री आर.जे अक्षय यांनी केले.व श्री.डॉ.विवेक मुगळीकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक हिंजवडी पोलीस ठाणे यांनी आभार प्रदर्शन केले.

(काकासाहेब डोळे)
पोलीस उप-आयुक्त ,परि-२
पोलीस आयुक्तालय पिंपरी चिंचवड

Scanned with CamScanner